निवडणूक तात्काळ/ई-मेलद्वारे

माहे जानेवारी ते मे-२०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१६/प्र.क्र.१०/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०१६

**प्रति,**
**जिल्हाधिकारी (सर्व),**
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).*

**विषय :-** **माहे जानेवारी ते मे-२०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम....**

**संदर्भ :-** १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१६/प्र.क्र.७/का-८, दिनांक ०१/०६/२०१६ रोजीचा प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि.०१/०७/२०१६ रोजीचा मतदार यादी कार्यक्रम.

महोदय / महोदया,

ज्याअर्थी, उक्त संदर्भ क्र.२ अन्वये देण्यात आलेला माहे सप्टेंबर-२०१६ ते मे-२०१७ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम पार पडला होता. तथापि, प्रशासकीय कारणास्तव निवडणूक कार्यक्रम हा फक्त सप्टेंबर ते डिसेंबर-२०१६ या तीन महिन्यांमध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच राबविला गेला आहे,

त्याअर्थी, आता माहे जानेवारी ते मे-२०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सर्वत्रिक तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी **मतदार यादीचा कार्यक्रम अंशत: सुधारीत करयात येत असून त्याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-**

१. **सदर मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम पुढे नमूद करण्यात आलेल्या बाबींकरीता लागू असेल :**

अ) माहे जानेवारी ते मे-२०१७ या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती.

आ) **नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायती,** ज्यांची **प्रभाग रचना व आरक्षणाची प्रक्रिया संपन्न** झालेली आहे.

इ) दिनांक १०/१०/२०१६ या दिनांकापर्यंत **अनर्हता, राजीनामा व मयत या कारणांमुळे ग्रामपंचायतींच्या रिक्त** झालेल्या जागांच्या पोट निवडणुकांसाठी.

या मतदार यादी कार्यक्रमासाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम-१२ चे पोट कलम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्रामपंचायतींच्या प्रभागांनुसार विभागून ती

निवडणुकीकरीता तयार करणे व अधिकाऱ्यांनी अधिसूचित करणे, या प्रयोजनासाठी **शुक्रवार दिनांक १६/०९/२०१६ ही तारीख अधिसूचित करण्यात असून त्याची राजपत्रात प्रसिद्धीची प्रत** जिल्हाधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल.

२. वरील (इ) मध्ये नमूद केलेली पोट निवडणुकांसंदर्भातील रिक्त पदांची माहिती, आयोगाच्या दिनांक ३०/१२/२०१४ रोजीच्या परिपत्रकातील विहित नमुन्यात भरून, आपल्या जिल्ह्याच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हापरिषद यांच्याकडून प्रमाणित करून घेण्यात यावी. अशी प्रमाणित यादी प्राप्त झाल्यानंतर अनर्हतेच्या आदेशामुळे रिक्त झालेल्या पदांच्या बाबतीत विभागीय आयुक्त यांच्याकडे अपील प्रलंबीत नाही तसेच या आदेशाविरोधात न्यायालयीन याचिकेच्या सुनावणी दरम्यान स्थगिती आदेश देण्यात आलेला नाही याची खात्री करण्यात यावी. याप्रमाणे खात्री केल्यानंतर पोट निवडणुकासाठी मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या **रिक्त पदांसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात व अशा याद्या प्रसिध्द केल्याबाबतचा ग्रामपंचायत व पदनिहाय तपशिलवार अहवाल, जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने बुधवार दिनांक २७/१०/२०१६ पर्यंत आयोगास न चुकता सादर करावा.**

३. सदर मतदार यादी कार्यक्रम पार पाडताना **खालील कार्यपध्दतीचे पालन** करण्यात यावे.

**अ) उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीचे विधानसभेच्या संबंधित भागाच्या मतदार यादीनुसार विभाजन करावे.**

**ब)** सदर प्रभागनिहाय मतदार याद्या या विधानसभेच्या संबंधित भागाच्या दिनांक १६/०९/२०१६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीवरून जशाच्या तशा वापरावयाच्या असल्याने या मतदार याद्या **कोणत्याही परिस्थितीत हस्तलिखीत स्वरूपात** तयार करण्यात येऊ नयेत. तसेच विधानसभेच्या भागनिहाय यादीच्या आवश्यक तितक्या प्रती छापून किंवा झेरॉक्स करून घ्याव्या व प्रभागनिहाय मतदार यादी तयार करावी. जर एका मतदार यादी भागात एकापेक्षा जास्त प्रभागातील मतदारांच्या नावांचा समावेश असेल तर इतर प्रभागातील मतदारांची नावे अनावश्यक असल्याने ती लाल शाईने **X अशी निशाणी** करून वगळण्यात यावीत.

**क) प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित प्रभागातील मतदारांच्या नावासाठी दिनांक २५/१०/२०१६ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिध्द** करण्यात याव्यात. अशी प्रभागनिहाय **प्रारूप मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री** करून घ्यावी.

**i) ग्रामपंचायतींची यादी तयार करताना विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान असणे आवश्यक आहे.**

**ii) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत** आयोगाच्या आदेश क्र-मनपा/रानिआ-२००७/प्र.क्र.६/का-५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

**iii) मयत अथवा स्थानांतरीत मतदारांच्या बाबतीत** आयोगाच्या आदेश क्र-मनपा/रानिआ-२०१०/प्र.क्र.४/का-५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

iv) आयोगाने जाहीर केलेल्या ग्राह्य धरण्यात येणाऱ्या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी जशीच्या तशी त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते त्यामुळे विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यामधील दुरूस्ती करणे इत्यादी बाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश).

v) सदर मतदार यादी कार्यक्रमाबाबत स्थानिक नागरिकांना सूचित करण्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी, करमणूक अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक इ. यंत्रणामार्फत जिल्हा तसेच तालुका पातळीवरील सर्व प्रकारच्या (वृत्तपत्र, केबल चित्रवाणी इ.) प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी, जेणेकरून प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी स्थानिक नागरिकांकडून त्यांची नावे मतदार यादीमध्ये नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होणार नाहीत.

ड) या प्रारूप मतदार याद्यांवर दिनांक ०७/११/२०१६ पर्यंत स्थानिक मतदारांकडून प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांच्या बाबतीत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

i) लेखनिकांच्या काही चुका असल्यास त्या सुधारण्यात याव्यात.

ii) ग्रामपंचायतींच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, ग्रामपंचायतींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावीत.

iii) सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती विचारात घेवून त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीत करणे व तसे केल्याबाबत संबंधित अर्जदारास कळविणे आवश्यक आहे, जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

इ) यानंतर दिनांक १६/११/२०१६ रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबाबतची सूचना प्रसिध्द करण्यात यावी.

४. मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतींच्या किंवा प्रभागाच्या रिक्त पदांबाबत न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

५. मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा. आपल्या कामाचा आढावा मा. आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

६. सदर मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. तसेच मतदार यादी कार्यक्रमानुसार योग्य ती कार्यवाही वेळेवर करण्याकरीता **आवश्यक उपाययोजना व नियोजन करण्याची दक्षता** आपल्या स्तरावर घेण्यात यावी.

८. सदर मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम आयोगाच्या www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत :-** १) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच **या** ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते **अनुदान तात्काळ वितरित** करण्याची व्यवस्था करावी.

२) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.**

४) सहायक आयुक्त, संगणकीकरण कक्ष यांना संबंधित मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

५) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

६) मा. आयुक्त व सचिव यांचे स्वीय सहायक.

७) सर्व निवडणूक कार्यासने.

८) निवड नस्ती (कार्यासन-८) राज्य निवडणूक आयोग.

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१६/प्र.क्र.१०/का-८ दि. १४/१०/२०१६ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी आदेशित केलेला माहे जानेवारी ते मे २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | शुक्रवार दि. १६/०९/२०१६ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून ग्रामपंचायतीच्या निवडणुकीकरीता प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार दि.२५/१०/२०१६ |
| ३ | हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | सोमवार दि.०७/११/२०१६ पर्यंत |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम १९५९ मधील नियम ३ चे पोटनियम (५) नुसार मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | बुधवार १६/११/२०१६ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र